**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २१ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय युवा संसद परिषद हे भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम - उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन.**
2. **धार्मिक कार्यक्रमांनी रमजान ईद साजरा.**
3. **टीबी मुक्त भारत अभियानाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिके तर्फे रोगनिदान केंद्रात पोषण आहार किटचे वितरण.**
4. **विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

-------------------------------------

उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन

भारतीय युवा संसद परिषद हे केवळ चर्चेचे व्यासपीठ नसून ते भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. या परिषदेच्या माध्यमातून तुमच्या विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपले आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपले नेतृत्व प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज नागपुरात केलं.रेशीमबाग इथल्या महर्षी व्यास सभागृहात 29 व्या भारतीय युवा संसद परिषदेचं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, भारतीय युवा संसद परिषदेचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी व्यासपीठावर उपस्थित होते. मातृभाषेचा वापर प्रादेशिकतेशी नव्हे तर स्वत्वाशी निगडित आहे असं ते म्हणाले. आपल्या मातृभाषेप्रमाणेच इतर भाषांचाही आदर केला पाहिजे असं मत त्यांनी व्यक्त केलं.

***(होल्ड बाईट - उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन)***

भारताची युवा पिढी ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. ही उत्साही व गतिमान पिढी राष्ट्र निर्माणात मोलाची ठरणार आहे. २०४७ या वर्षापर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी केवळ आर्थिक योगदानापुरते मर्यादित राहता येणार नाही. यासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिकही योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज येथे केले. दरम्यान, उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी रेशीमबाग येथील स्मृती मंदिर मध्ये अभिवादन देखील केलं.

------------------------------------

ईद नवरोज शुभेच्छा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण आत्मसंयम, वंचितांबद्दल करुणा बाळगण्याची तसंच दानधर्म करण्याची शिकवण देतो असं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या. तर या मंगलप्रसंगी सर्वांना आनंद, सुख, उत्तम आरोग्य आणि समृद्धी लाभो अशी कामना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.
राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही राज्यातल्या जनतेला ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पारसी बांधवांना नववर्ष नवरोजच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे नवं वर्ष सर्वांना समृद्धी आणि आनंदाचं जावो असं त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलंय. तसंच त्यांनी सर्वांचं उत्तम आरोग्य आणि आकांक्षापूर्तीसाठीही प्रार्थना केली.

------------------------------------

रमजान ईद

ईदनिमित्त नागपूरच्या ऐतिहासिक मोमिनपुरा भागातील गरीब नवाज मशीद परिसरात आज नमाज अदा करण्यात आली. यावेळी नागपूर पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. हिंदू-मुस्लीम ऐक्याचं प्रतीक असलेल्या या भागात दोन्ही समाजातील नागरिकांनी एकत्र येत ईदचा आनंद साजरा केला. अकोला इथं शहरातील हरिहर पेठ मधल्या ऐतिहासिक ईदगाहवर मुक्ती आजम मौलाना गुलाम मुस्तफा साहब यांच्या नेतृत्वात विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.
वाशीम शहरासह जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा तालुक्यातही रमजान ईद शांततेत आणि उत्साहात साजरी होत आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाकडून कडक

बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. बुलढाणा शहरातही ईद सणाचा उत्साह बघायला मिळाला.

-------------------------------------

रामदास आठवले

नागपूरात पत्रकार परिषदेत रामदास आठवले यांनी खेड्या-पाड्यातील दलितांवरील अन्याय थांबविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. समाज जोडण्याचे काम मंत्रालयातर्फे राबविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ४ एप्रिलला पुणे इथं पक्षाची राज्य कमिटी बैठक होणार असून वर्षभर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले जाणार आहे. तसेच १७ मे रोजी पोर्टब्लेयर येथे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

-------------------------------------

आंतरराष्ट्रीय वन दिन

आज 'आंतरराष्ट्रीय वन दिन' साजरा होत आहे. यानिमित्त केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी नागरिकांना वनं आणि वन्यजीवांच्या संरक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन केलं आहे. वन ही केवळ उपभोग घेण्याची वस्तू नसून ती स्वतःच एक जीवनप्रणाली आहे, असे त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये नमूद केले.

-------------------------------------

टीबी मुक्त भारत

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम आणि टीबी मुक्त भारत अभियानाच्या अनुषंगाने आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने महाल येथील रोगनिदान केंद्रात १०० क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम स्व. प्रभाकरराव दटके स्मृती संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. राऊत, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार आणि झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय तिवारी यांच्या हस्ते झाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रुग्णांना किटचे वाटप करण्यात आले. डॉ.राऊत यांनी "निक्षय मित्र" बनून क्षयरुग्णांना मदत करण्याचे आवाहन केले. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढील काळात आणखी १०० रुग्णांना पोषण किट देण्याची घोषणा केली. कार्यक्रमाला आरोग्य अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------------------------------

‘जस्टा कॉजा

ट्रायल कोर्टातील वकिलीमधूनच खऱ्या अर्थाने कायद्याचे शिक्षण मिळते, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती अभय ओका यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथे ‘जस्टा कॉजा २०२६’ महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभिक न्यायालये ही सामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच, नियमित सराव, निरीक्षण आणि निष्पक्षपणा हे चांगल्या वकिलाचे मुख्य गुण असल्याचे त्यांनी सांगितल.

-------------------------------------

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प

यवतमाळच्या नेर तालुक्यातील मौजा उत्तरवाढोणा येथे रिलायन्स इंडस्ट्रिज कंपनीच्या माध्यमातून सुमारे 300 कोटी रुपयांचा कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्हा गॅस निर्मितीत आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने वाटचाल करणार असून शेतकऱ्यांनाही मोठा फायदा होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पालकमंत्री संजय राठोड यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी या प्रकल्पाचा आढावा घेतला आणि प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश दिले.

-------------------------------------

मेजर हेमंत जकाते श्रद्धांजली

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी  मेजर हेमंत जकाते यांनी अखेरच्या श्वासापर्यंत समाजसेवेसाठी समर्पित जीवन जगल्याचे सांगत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. नागपूर येथे आयोजित श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.सामाजिक जबाबदारी आणि संवेदनशीलता जपत त्यांनी सैन्यातून निवृत्तीनंतरही समाजासाठी कार्य केले, असे गडकरी म्हणाले. गरीब रुग्णांसाठी त्यांनी दिलेल्या देणगीचा उल्लेखही त्यांनी केला. विविध मान्यवरांनी जकाते यांच्या कार्य व व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा दिला.

-------------------------------------

हवामान

विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येल्लो अलर्ट देण्यात आला आहे. उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात हवामान सामान्य राहणार दि. 24 आणि 25 मार्च रोजी पुन्हा चंद्रपूर, गडचिरोलीसह, यवतमाळ आणि गोंदिया जिल्ह्यात देखील वादळी पर्जन्यमान राहू शकतं असा अंदाज नागपूरच्या

प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पुढील २४ तासांत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही तुरळक पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. अकोला जिल्ह्यात गुरुवारी रात्री वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसानं १२ गावांतल्या सुमारे १२२ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं. यात पातुर तालुक्यातली दोन, अकोटमधली नऊ तर अकोल्यातल्या एका गावाचा समावेश आहे. बागायती गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा, तसंच पपई संत्रा, टरबूज, केळी, आंबा आदी पिकांसह भाजीपाला पिकांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालात ही माहिती देण्यात आलीय.

-----------------------------------

देशव्यापी मोहीम

देशातल्या शाळाबाह्य मुलांना शोधून त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी सरकार लवकरच एक देशव्यापी मोहीम सुरु करणार असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंतर्गत शिशुवर्गापासून माध्यमिक शालेय शिक्षणात २०३० सालापर्यंत १०० टक्के शाळाभरतीच्या उद्दिष्टांची या मोहिमेमुळे पूर्तता होऊ शकेल. ज्या मुलांना आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक समस्यांमुळे नियमित शाळेत शिक्षण घेता येत नाही, अशा मुलांसाठी राष्ट्रीय मुक्त शालेय संस्था अर्थात 'एनआयओएस'ची १० हजार अभ्यासकेंद्र देशभरात सुरु करण्याची सरकारची योजना आहे.

-----------------------------------

एअर इंडिया

एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसची ४२ विमानांची सेवा आज पश्चिम आशियाई क्षेत्रात सुरू राहणार आहे. याशिवाय जेद्दाह आणि मस्कटसाठीही एअर इंडियाची विमानसेवा सुरू राहील. या क्षेत्रातील काही मार्गांवर अद्याप विमानसेवा निलंबित आहेत. दरम्यान, पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, आखातातली काही हवाई क्षेत्रं टाळण्याचा सल्ला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं विमान कंपन्यांना दिला आहे.

-----------------------------------